| **Publication** – Nashik Vichar | **Page No** - 03 |
| --- | --- |

# जानेवारी २०१९ मध्ये होणार मुंबईमध्ये आशियातील सर्वात मोठ्या रबर प्रदर्शनाचे आयोजन

## इंडिया रबर एक्सपो, मुंबई २०१९ मध्ये एकाच ठिकाणी अंदाजे ३०० प्रदर्शक आढळतील

नाशिक – इंडिया रबर एक्सपो (आयआरइ) हा आशियाचा सर्वात मोठा रबर एक्सपो आहे, २००१ मध्ये त्याचा आरंभ झाला होता तेव्हापासून तो आज रबर उद्योगातील सर्वात जास्त अपेक्षित कार्यक्रमांपैकी एक आहे. आता १० वे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि परिषद मुंबईमधल्या बॉम्बे एक्झिबिशन सेंटरमध्ये आयोजित केली जाणार असून ते विकास, आदानप्रदान आणि सहयोगासाठी उत्तम मंच ठरणार आहे. या आघाडीच्या कार्यक्रमाचे आयोजन ऑल इंडिया रबर इंडस्ट्रिज असोसिएशन या १९४५ मध्ये स्थापन झालेल्या देशातील सर्वात जुन्या प्रिमियर इंडस्ट्रिज असोसिएशनमार्फत होणार आहे ऑल इंडिया रबर इंडस्ट्रिज असोसिएशनची स्थापना भारतीय रबर उद्योगाचे संरक्षण करणे आणि त्याला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने झाली होती, आज ही संस्था १२०० + सक्रिय सभासदांसोबत विस्तीर्ण संबंधांसोबत उद्योगाचा आवाज बनली आहे.

इंडिया रबर एक्सपो २०१९ आंतरराष्ट्रीय मानकांना पूर्ण करण्याकडे, जगभरातील औद्योगिक व्यावसायिकांचे इंडिया रबर एक्स्पो, मुंबई येथे स्वागत करण्यासाठी सज्ज आहे. भारतीय कंपन्यांना आंतरराष्ट्रीय कंपन्यांची भेट घेण्यासाठी आणि त्यांच्यासोबत सहयोग करण्यासाठी आगळावेगळा मंच मिळत आहे. विकसित होणाऱ्या रबर उद्योगाचा अंगभूत भाग म्हणून आयआरइ रबर उद्योगातल्या भारताच्या दुसऱ्या सर्वात जलद गतीने प्रगती करणाऱ्या अर्थकारणाचे स्पष्ट निदर्शक आहे. आयआरइ रबर उद्योगाच्या अत्याधुनिक तांत्रिक प्रगतींचे प्रदर्शन करेल आणि आरएडी व दर्जा नियंत्रणाच्या बाजारपेठेतील सद्यस्थिती, सुविधा आणि सेवांबद्दल माहिती देणार आहे. रबर उद्योगासंबंधीच्या शासनाच्या बदलत्या नियमांबद्दल आणि नियंत्रणाबद्दल सूचना मिळत राहण्याची ही एक चांगली संधी असेल.

३०० च्या आसपास संख्येने प्रदर्शक २६००० चौ. मी. हून

India Rubber Expo

जास्त क्षेत्रफळ असलेल्या प्रदर्शन भागात आपले स्टॉल लावणार आहेत. इंडिया रबर एक्सपो आपल्या १० व्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि परिषदेचे आयोजन करण्यासाठी सज्ज असून हा अतिशय प्रसिध्द सोहळा आहे, यामार्फत रबर व्यावसायिकांना भेटण्यासाठी आणि रबर उद्योगातील वर्तमान आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय ट्रेंड्स तसेच नवमतांबद्दल चर्चा करण्याचा हा सर्वात मोठा मंच ठरणार आहे. या व्यतिरिक्त आयआरइ खरेदीकर्ता आणि विक्रेत्यांना रबर उद्योगातील काही नामवंतांना भेटण्याची संधी देणार आहे.

श्री विष्णू भीमराजका, चीफ कन्वेयर आयआरइ २०१९ यांचा रबर बाजारपेठेच्या भक्कमपणावर ठाम विश्वास आहे आणि ते आयआरइच्या पहिल्या इंडोसर्सपैकी एक आहे. त्यांच्या मते, इंडिया रबर एक्सपो २०१९ उद्योगातील अग्रणींना एकत्र आणण्याचा एक उत्तम सोहळा आहे. या अभूतपूर्व उपक्रमामुळे उद्योगातील



व्यावसायिकांना संकल्पना आणि तांत्रिक प्रगतीचे आदानप्रदान करण्यासाठी मंच मिळेल आणि त्यामुळे आगामी काळात देशाच्या आवश्यकता पूर्ण केल्या जाऊ शकतील. या प्रदर्शनाच्या मार्फत व्यापारउदिमाला सामाजिक, आर्थिक विकासात रूपांतरित करण्यासाठी भारतीय अर्थकारणाचे बहुदिशाभिमुख स्वरूप आणि मेक इन इंडिया अभियान पहायला मिळणार आहे.

**इंडियन रबर एक्सपोबद्दल**

इंडिया रबर एक्सपो हा आशियाचा सर्वात मोठा रबर एक्सपो आहे. २००१ मध्ये त्याचा आरंभ झाला होता तेव्हापासून तो आज भारतातील रबर उद्योगाला अपूर्व संधी मिळवून देणाऱ्या कार्यक्रमांपैकी एक आहे. आता १० वे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि परिषद मुंबईमधल्या बॉम्बे एक्झिबिशन सेंटरमध्ये आयोजित केली जाणार असून तो विकास, आदानप्रदान आणि सहयोगासाठी उत्तम मंच ठरणार आहे.

आयआरइ भारतीय कंपन्यांना परदेशी कंपन्यांसोबत भेट घेण्याची आणि सहयोग करण्याची आगळीवेगळी संधी देत आहे. विकसीत होणाऱ्या रबर उद्योगाचा अंगभूत भाग म्हणून आयआरइ रबर उद्योगातल्या भारताच्या दुसऱ्या सर्वात जलद गतीने भरभराट होणाऱ्या अर्थकारणाने स्पष्ट निदर्शक आहे.

आपल्या स्थापनेपासून एक दशकाहून जास्त काळ प्रगती करणारा इंडिया रबर एक्सपो २००१ मधल्या केवळ ३००० चौरस मीटरवरून २०१९ मध्ये २६००० चौरस मीटर एवढ्या भव्यतेपर्यंत वाढला आहे.